# मा.मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६.०७.२०१३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत

मा.मुख्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत खालील राज्य माहिती आयुक्त उपस्थित होते.

१.श्री रत्नाकर गायकवाड, राज्य मुख्य माहिती आयुक्त
२. श्री. भास्कर पाटील, राज्य माहिती आयुक्त. नागपूर
३. श्री. डी.बी.देशपांडे राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद
४.श्री. पी.डब्ल्यू पाटील, राज्य माहित आयुक्त नासिक

राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६.०७.२०१३ रोजी बैठकीस सुरुवात झाली बैठकीच्या सर्व उपस्थित मा.आयुक्तांबरोबर खालील मुद्यावर चर्चा करण्यात आली.

1. बैठकीच्या सुरुवातीस उपस्थित खंडपीठाच्या अपील सुनावणी कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. त्यात मुख्य माहिती आयुक्त यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सची सुविधा मुंबईतील मुख्य आयोगाच्या कार्यालयातील सुनावणी कक्षात करण्यात आली असून लवकरच व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे विविध जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालयाशी जोडणी करुन सुनावणी सुरु करण्यात येत आहे. तसेच आयोगाच्या इतर खंडपीठाशी सुध्दा मुख्य माहिती आयुक्त कार्यालयाच्या व्हिडिओ कॉन्फरन्सची जोडणी करण्यात येणार असून प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाशी व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे सुनावणी घेण्याबाबत इतर मा. राज्य माहिती आयुक्तांशी चर्चा करण्यात आली व याबाबत शासनाशी पत्रव्यवहार करावा असे मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. गावडे,सचिव यांना सुचना दिल्या.
2. माहिती आयोगाच्या सर्व खंडपीठाच्या अपील निर्गतीबाबत मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी आढावा घेतला त्यात पुणे खंडपीठामध्ये अपीलाची आवक जास्त असून अपीलाची निर्गती त्या मानाने खुपच कमी असल्याने मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी नाराजी दर्शवली.
3. राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय व राज्य माहिती आयुक्त कार्यालयातील जी न्यायालयीन प्रकरणे आहेत त्यासाठी मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांना वादी केले असले तरी आयोगाच्या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी यांनी पाठपुरावा करणे संयुक्तिक नाही. कारण आयोग ही स्वायत्त अशी अर्धन्यायिक (Quasi Judicial)यंत्रणा आहे. त्यामुळे यापुढील कोणत्याही आयोगाच्या कार्यालयातून न्यायालयीन प्रकरणांना पाठपुरावा करणे किंवा आयोगाच्या अधिका-यानी सुनावणीसाठी न्यायालयात उपस्थित राहणे अपेक्षित नाही., असे मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी बैठकीत नमूद केले.
4. श्री.पी.डब्ल्यु पाटील, राज्य माहिती आयुक्त,नासिक यांनी बृहन्मुंबई खंडपीठाचा कार्यभार सांभाळूनही नासिक खंडपीठाच्या अपील निर्गती मोठया प्रमाणात केल्याबाबत मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी समाधान व्यक्त केले.
5. माहिती आयोगाच्या अपील व तक्रारीच्या संबंधी प्रलंबित प्रकरणाचा मासिक अहवाल विहित नमुन्यात सादर करण्यात यावा असे मुख्य माहिती आयुक्तांनी सर्व राज्य माहिती आयुक्तांना सुचित केले.
6. श्री.भास्कर पाटील, राज्य माहिती आयुक्त, नागपूर हयांची जुलै 2013 रोजी मुदत संपत असून, आयोगात बृहन्मुंबई, कोकण व अमरावती येथील आयुक्तांची पदे रिक्त असल्याने याबाबत शासनाशी पत्रव्यवहार करण्याच्या सूचना मुख्य माहिती आयुक्त यांनी सचिवांना देण्यात आल्या.
7. राज्य माहिती आयोगाच्या व्दितीय अपीलाचे प्रारुप नियमामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्याबाबतची झाली.
   नियम क्र. 3 मध्ये शेवटून दुस-या ओळीत concern ऐवजी concerned असा उल्लेख असावा.
   नियम क्र.6 मधील दुस-या ओळीत at least शब्द वगळावा असे ठरले. त्यातील vi) मधील registered post ऐवजी Ordinary post असा बदल करावा.
   नियम क्र.8 मधील पाचव्या ओळीत or he may opt not to be present. हे वाक्य वगळावे.

नियम क्र.9 मधील iii) मध्ये authorized officer नंतर of public authority नमूद करावे. iv) मध्ये दुस-या ओळीत PIO नंतर unless commission desires so हे अंतर्भूत करावे व तिस-या ओळीत unless such authority desires a personal hearing हे वाक्य वगळावे.

नियम क्र.11 (1) च्या सुरुवातीस as far as possible नमूद करुन पुढील pronounce in open proceedings and be हे वाक्य वगळावे. तसेच तिस-या ओळीतील Registarar शब्दाऐवजी Registar असा शब्द नमूद करावा.

तसेच (2) मधील दुस-या ओळीत register post ऐवजी ordinary post शब्द घालावा.

वरील चर्चे नंतर बैठक समाप्त झाल्याचे जाहिर केले.

( रत्नाकर गायकवाड )
राज्य मुख्य माहिती आयुक्त